महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

दुरध्वनी ०२२-६९४२५००० website: www.mahagenco.in Email ID- apoclaims@mahagenco.in.

**क्र. महानिर्मिती/ग.मु.वि.यो/नामनिर्देशन/मासं-देयके/** 08935 **दिनांक :** 06 OCT 2026

# परिपत्रक

**विषय:** महानिर्मिती कंपनीत दि.०७.१०.२०२१ या तारखेपासून मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना कंपनीमार्फत गट मुदत जीवन विमा योजनेची रक्कम रु.२०.०० लाख अदा करण्याअंतर्गत मिळणाऱ्या रक्कमेकरीता नामनिर्देशनाबाबत.

**संदर्भ:** महानिर्मिती कंपनीचे परिपत्रक क्र. औसं/ग.मु.जी.वि/४७/१८११ दि. २३.०२.२०२२

---

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकान्वये मयत झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांना कंपनीमार्फत गट मुदत जीवन विमा योजनेची रक्कम रु.२०.०० लाख अदा करण्याकरीता नामनिर्देशन नसल्याने त्यांच्या वारसांना मा.न्यायालयाकडून वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळवण्याकरीता मानसिक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत होते.

त्याअनुषंगाने, मयत अधिकारी/कर्मचारी यांच्या वारसांना सदर रक्कम मिळविण्याकरीता होणारा मानसिक व आर्थिक त्रास कमी करण्याच्या उद्देशाने नामनिर्देशन नमुना भरुन घेण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

त्यासअनुसरुन, संदर्भिय परिपत्रकान्वये महानिर्मिती कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून नामनिर्देशन नमुना भरण्याबाबतच्या प्रस्तावास सक्षम अधिकारी यांनी मंजूरी प्रदान केलेली आहे.

तथापि, ज्या मयत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांमध्ये वादविवाद/आक्षेप असेल अशा वारसांबाबत मा.न्यायालया मार्फत देण्यात येणारे वारसाहक्क प्रमाणपत्रानुसार (Succession Certificate) सदर रक्कम कायदेशीर वारसांना देय्य करण्यात यावी.

**सांघिक कार्यालय/सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी आपल्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून सोबत जोडलेला नामनिर्देशन नमुना भरुन संबंधित नोंद त्यांच्या सेवापुस्तिकेत घेण्यात यावी.**

सदर परिपत्रक https://esevarth.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(धनाजी तोरस्कर)

कार्यकारी संचालक (मासं)

## नामनिर्देशन नमुना

## गट मुदत जीवन विमा योजनेखाली रक्कम रु.२० लाख लाभासाठी नामनिर्देशन

सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसं/ग.मु.जी.वि/४७/१८११ दि. २३.०२.२०२२ मधील मुद्दा क्र. ३ अन्वये दि.०७.१०.२०२१ ते विमा योजना कार्यान्वित होणाऱ्या तारखेपर्यंत मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना महानिर्मिती कंपनीमार्फत देय्य होणाऱ्या रक्कम रु.२० लाख करीता मी श्री./श्रीमान /श्रीमती/ कुमारी ---------------------------------------- -------------- पदनाम---------------------------- खाली नमूद केलेल्या व्यक्तीस/व्यक्तींना नामनिर्देशित करीत आहे. आणि असा आदेश देत आहे की, सदर रक्कम त्यांना नावासमोर निर्देशित केल्याप्रमाणे त्यांना विभागून देण्यात यावी.

| नामनिर्देशित व्यक्तीचे संपूर्ण नांव व पत्ता (व्यक्तीची नावे व पत्ते) | मयत कर्मचाऱ्याशी असेलेले नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | प्रत्येकाला द्यावयाचा रक्कमेचा हिस्सा | ज्यामुळे नामनिर्देशन रद्दा होईल असा/असे आकस्मिक प्रसंग | नामनिर्देशित व्यक्ती मरण पावल्यास तिचा हक्क ज्या व्यक्तीकडे जाईल त्या व्यक्तीचे नाव, पत्ता, नाते व वय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

ठिकाण:

दिनांक:

कर्मचाऱ्याची सही

साक्षीदारांचे नाव व सही:

१.

२.

---

(कार्यालयाच्या उपयोगासाठी)

नामनिर्देशन मिळाल्याचा दिनांक:

कार्यालय प्रमुखाचे पदनाम व सही